दै.बीड
www.beedsuperfast.com
# सुपरफास्ट
संपादक : अतुल शंकरराव जाधव

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| बीड (महाराष्ट्र) | वर्ष ३ | अंक २३७ | मंगळवार दि. २६ ऑगस्ट, २०२५ | RNI : MAHMAR/2023/84694 | पाने ४ | किंमत ४ रु. |
| BEED (Maharashtra) | Year-3 | Issue-237 | Tuesday 26 August, 2025 | RNI : MAHMAR/2023/84694 | Pages 4 | Price 4 |


## मराठा समाज बांधवांनी मुंबई मोर्चात लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे – सचिन शिंदे



**नेकनूर । प्रतिनिधी**

अंतरवली सराठी ते मुंबई मोर्चात व तेथील आंदोलनात मराठा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे. मराठा आरक्षणाचा लढा महाराष्ट्रात चाळीस वर्षापासुन सुरु आहे. दोन वर्षांपासून जरांगे पाटलांच्या बेमुदत उपोषण आंदोलनानंतर शासनाने कुणबी नोंदी शोधण्यासाठी शिंदे समितीची स्थापना करून मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रात लाखो समाज बांधवांना कुणबी प्रमाणपत्र वितरीत करुन त्यांचा ओबीसीत समाविष्ट करण्यात आला. परंतु सगेसोयरे, हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेट या उर्वरित मागण्यासाठी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मनोज जरांगे पाटील आंदोलन करणार आहेत त्यांना साथ देण्यासाठी सर्व वंचित, शोषितांसह सर्व मराठा बांधवांनी लाखोंच्या संख्येने सहभागी होऊन आरक्षण मिळवण्याच्या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे.

# गेवराई मध्ये चप्पलफेक, लक्ष्मण हाके आणि विजयसिंह पंडितांच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा!

**गेवराई । प्रतिनिधी**

बीडमध्ये ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला आहे. लक्ष्मण हाके यांनी ओबीसी समाजाच्या बैठकीत विजयसिंह पंडित यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. त्यानंतर या दोन नेत्यांमधील वादाला सुरुवात झाली होती. हाके यांच्या विधानाचा निषेध करत पंडित यांच्या कार्यकर्त्यांनी गेवराईमध्ये लक्ष्मण हाके यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन केले होते, त्यामुळे हा वाद आणखी पेटला होता. गेवराईमध्ये राडा आमदार विजयसिंह पंडित यांनी मनोज जरांगेंना पाठिंबा देत चलो मुंबईचे बॅनर लावले होते. त्यामुळे हाकेंनी वादग्रस्त विधान केले होते. त्यामुळे पंडित यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते, तसेच त्यांनी हाके यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळला होता. त्यानंतर पंडित यांना आव्हान








देत आज लक्ष्मण हाके गेवराईत आले होते. यावेळी दोन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर चपला फेकत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न पोलिसांकडून करण्यात आला. हाके यांचं आमदार पंडित यांना आव्हान यावेळी बोलताना लक्ष्मण हाके यांनी, 'कुणाच्याही दहशतीखाली राहणारे आम्ही नाही आहोत. गावगाड्यामध्ये राहणारे आम्ही आहोत. बास झालं तुमचं शोषण, तुमचा माणूस मुख्यमंत्र्यांना शिव्या देतो. आम्ही सुद्धा मर्दाची औलाद आहे. तुझ्या गावात आलो आहेत ५०० किलोमीटर अंतरावरून. दम असेल तर बाहेर ये' असं आव्हान आमदार विजयसिंह पंडित यांना दिलं आहे. पंडित यांनी केली होती हाकेंवर टीका याआधी विजयसिंह पंडित यांनीही लक्ष्मण हाके यांच्यावर सडकून टीका केली होती. पंडित यांनी, 'लक्ष्मण हाके हा श्वान आहे. त्यावर जास्त मी बोलणार नाही आणि हा अदखलपात्र हा माणूस आहे. आमच्या मतदार संघातील लोकांनी या लक्ष्मण हाके नावाच्या श्वानाला ओळखलं आहे. याने या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत माझ्या विरोधात प्रचार केला होता. त्याने ज्या उमेदवाराचा प्रचार केला त्याचं डिपॉझिट जप्त झालं आहे. हा दलाल श्वान आहे आणि हा स्ट्रीट डॉग आहे आणि हा रिचार्जवाला डॉग आहे. त्यामुळे आम्हाला सगळं माहीत हा कोणाच्या बोलण्यावरून भुंकतो आहे, ते आणि त्याचे सगळे पुरावे माझ्याकडे आहेत' असं विधान केलं होतं.

# खा.सोनवणेंच्या हस्ते 'मांजरा'तील जलपूजन

## शेतकऱ्यांची राहणार उपस्थिती, दोन दरवाज्यातून पाण्याचा विसर्ग

### मांजरा धरणाची संक्षिप्त माहिती

**प्रकल्पीय क्षेत्र ४५ चौरस किमी.**
**पूर्ण संचयी पाणीपातळी ६४२.३७ मीटर**
**प्रकल्पीय एकूण पाणीसाठवण क्षमता २२४.०९३ दलघमी.**
**मृत पाणीसाठा ४७.१३० दलघमी.**
**उपयुक्त (जिवंत) पाणीसाठा क्षमता १७६.९६३ दलघमी.**



**केज । प्रतिनिधी**

केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे.आज सकाळी दहा वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते धरणातील पाण्याचे जलपुजन करण्यात येणार आहे. लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष लाभ होतो. तसेच धरणातील पाण्यावर बिगर सिंचन योजना सुध्दा २१ आहेत तर पिण्याच्या पाणी योजना १६ कार्यरत आहेत. नागरिकांना पिण्यासाठी सरासरी ६१.९३ दलघमी एवढे पाणी आरक्षित ठेवण्यात येते. पाण्याच्या सिंचनाच्या » पान २ वर

# मुख्याधिकारी विक्रम मांडुरके साहेब अनधिकृत बांधकामाचा सपाटा सुरूच

**गेवराई । प्रतिनिधी**

## अनधिकृत बांधकाम धारकाला अधिकाऱ्यांचे अभय

सध्या बऱ्याच ठिकाणी अनधिकृत बांधकामे होत असून यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर होत आहे याकडे नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे दुर्लक्ष पाहायला मिळत आहे याबाबत नगरपरिषद कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी बांधकामे करणाऱ्यांवर संबंधित अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई न केल्यामुळे संशयाला वाव मिळत आहे विनापरवाना चालू असलेल्या बांधकामावर कुठलीही कारवाई न करता अनधिकृत पणे कामे करणाऱ्या वर कारवाया थंडावल्या आहेत गेवराई शहरात अतिक्रमण धारकांवर एकीकडे कारवाया चालूच असताना शहरातील अनेक भागात अनाधिकृत बांधकामाच्या विरोधात कारवाई करण्याची टाळाटाळ सुरू आहे अनाधिकृत विना बांधकामांचा अधिक वेगाने सपाटा वाढला असून गेवराई नगर परिषदेच्या बांधकाम विभाग कर्मचाऱ्यांचा अनधिकृत कारभार चव्हाट्यावर देखील येत आहे ना कोणाचा धाक ना कोणाची पर्वा अशा अवस्था निर्माण झालीय. गेवराई शहरातील विविध बांधकामाची माहिती नगरपरिषद अंतर्गत असलेल्या बांधकाम विभागाला नाही असे कधीच होत नाही या विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी नोटिसा बजवण्यापलीकडे कुठलीही कारवाई न केल्यामुळे बांधकाम धारकांचे धाडस वाढले आहे अनधिकृत बांधकाम धारकाने रस्त्यांवर खडी, वाळू, सिमेंट, यासारखे साहित्य ठेवल्याने
येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना मोठी अडचण निर्माण होत आहे . नोटीस बजवल्याच्या तुलनेत अनेक अनधिकृत बांधकामे आहेत मात्र पोलीस बंदोबस मिळत नाही असे वेगवेगळे कारणे देत या कारवाईला टाळाटाळ केली जात आहे या पार्श्वभूमीवर अनेक बांधकाम धारकांनी विनापरवाना बांधकाम केल्याचा सपाटा लावला असल्याने नगरपरिषद येथील बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्याकडून बांधकाम धारकांना अभय मिळत असल्याची चर्चा आहे.अनधिकृत बांधकाम धारकांना पाठीशी घालणाऱ्या » पान २ वर

# जरांगे पाटलांच्या मुंबई मोर्चात लाखोंच्या संख्येत सहभागी व्हा

## शिवसेना शहर अध्यक्ष मुकेश आण्णा महाजन

**गेवराई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनीआवाहन केल्याप्रमाणे अंतरवली ते मुंबई मोर्चात व तेथील आंदोलनात कुणब्यांनी लाखोच्या संख्येने सहभाग नोंदवा असे आवाहन शिवसेना शहर अध्यक्ष मुकेश आण्णा महाजन यांनी केले आहे. मराठा आरक्षणाचा लढा महाराष्ट्रात चाळीस वर्षापासुन सुरु आहे. दोन वर्षांपासून जरांगेपाटलांच्या बेमुदत उपोषण आंदोलनानंतर शासनाने कुणबी नोंदी शोधण्यासाठी शिंदे समितीची स्थापना करून मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रात लाखो समाजबांधवांना कुणबी प्रमाणपत्र वितरीत करुन त्यांचा ओबीसीत समाविष्ट करण्यात आला. याच श्रेय फक्त मनोजदादा जरांगे पाटील, तसेच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनाच आहे. परंतु नोंदी शोधण्यात काम सुरू असताना अनेक गावात एकाच भावकितील काही लोकांच्या नोंदी सापडल्या तर काही लोकांच्या नोंदी त्यांच्या व प्रशासनाच्या निष्काळजीपणा मुळे, नोंदी आढळून आल्या नाहीत. त्यामुळे ते सर्व समाज बांधव आरक्षणा पासुन वंचित राहीले आहेत. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या
व ज्यांच्या नाही सापडल्या ते सर्व एकाच रक्त नाते संबंधातील, एकाच समूहातील असुन शेती हा धंदा करणारी आहेत. त्यामुळे ज्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्या उर्वरित मराठा समाज बांधवांचा ओबीसीत समावेश करावा या मागणी साठी जरांगे पाटील मुंबई त जाऊन आंदोलन

# हजरत शहेंशाह वली दर्गा उरुस निमित्त भव्य रक्तदान शिबीर


**बीड । प्रतिनिधी**

हजरत शहेंनशाह वली दर्गा उरुस निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन इनसानियतफाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख सोहिल , उपाध्यक्ष रिजवान चाऊस सचिव, शेख आवेज , यांनी केले असून दिनांक २६ ऑगस्ट मंगळवारी सकाळी १० ते दुपारी चार पर्यंत रक्तदान शिबिर होणार आहे . इनसानियतफाउंडेशनच्या वतीने हजरत शहेनशाह वली दर्गा उरुस निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होत



रक्तदान करावे, या रक्तदान शिबिराला प्रोत्साहन देण्यासाठी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, यांच्यासह शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकांना निमंत्रण देण्यात आले असून सर्वपक्षीय जिल्हाध्यक्ष व सर्व धर्मीय सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांनाही या भव्य रक्तदान शिबिरात सहभागी » पान २ वर

# सर्वांची साथ असेल तर बीडचे नगराध्यक्ष शफीक भाऊ : जलील








**माजलगाव । प्रतिनिधी**

ऑल इंडिया मजलिस–ए–इत्तेहादुल मुस्लिमीन (एआयएमआयएम) पक्षाच्या माजलगाव येथील जाहीर सभेत पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी सामाजिक एकता आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी जोरदार आवाज उठवला. या सभेत त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत पक्षाच्या नियोजनबद्ध रणनीती आणि भ्रष्ट व्यवस्थेला उखडून टाकण्याच्या संकल्प करीत सर्वांची साथ असेल तर बीडचे नगराध्यक्ष शफीक भाऊ असतील असे सांगत ॲड. शफीक भाऊ यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर केली.जनतेच्या सेवेसाठी एमआयएमचा निर्धार इम्तियाज जलील यांनी सभेला संबोधित करताना

सांगितले की, एआयएमआयएमचा मुख्य हेतू हा सर्वसामान्य जनतेची सेवा करणे आणि त्यांच्यातूनच सक्षम नेतृत्व निवडणे आहे. आम्ही येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ताकदीने उतरून भ्रष्ट व्यवस्थेला आव्हान देऊ. त्यांनी उपस्थित जनसमुदायाला मतदानाच्या माध्यमातून पक्षाला आशीर्वाद देण्याचे आवाहन केले, जेणेकरून सामाजिक न्याय आणि समतेची लढाई अधिक बळकट होईल. मुस्लिम समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सडेतोड भाष्य जलील यांनी मुस्लिम समाजावर होत असलेल्या अन्यायावर भाष्य करताना, जातीवादी शक्तींमुळे निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी नुकत्याच घडलेल्या सुलेमान पठाण यांच्या दुर्दैवी हत्येचा उल्लेख करत, या प्रकरणातील

आरोपींवर तातडीने कारवाई न झाल्यास कठोर पावले उचलण्याचा इशारा दिला. सुलेमान पठाण यांच्या सामूहिक हत्याकांडातील आरोपींना त्वरित अटक न झाल्यास, मुस्लिम समाज आणि एमआयएम एकजुटीने मुंबईच्या दिशेने शांततापूर्ण मोर्चा काढेल, असे त्यांनी ठणकावून » पान २ वर

# शाश्वत मत्स्योत्पादनाची गरज

भारतात मोठ्या प्रमाणात मासेमारी व्यवसाय होतो. या क्षेत्रात लाखो भारतीय नागरिक कार्यरत आहेत. मासळी उत्पादन क्षेत्रातून भारताला सन २०२३-२४मध्ये ७.३८ अब्ज डॉलर इतके परदेशी चलन प्राप्त झाले असून एकूण ६०,५२३ कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल मासळी निर्यातीतून झाली आहे. भारताला एकूण ११,०९८.८१ किमी क्षेत्राचा सागरी किनारा लाभला असून अकरा राज्ये मासळी व्यवसात कार्यरत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून निर्यात होणाऱ्या मासळी मालांवर ५८.२६ टक्के इतका आयात कर लागू केला आहे. त्यातील ८.२६ टक्के कर हा सामुद्रिक पर्यावरणावर विपरीत परिमाण करून मासेमारी करत असल्याने अँटी डम्पिंग अँड काऊंटरव्हेलिंग टॅक्स अशा स्वरूपाचा आहे. भविष्यात भारतीय मासळी व्यवसायामध्ये या निर्बंधांचा किती दुष्परिणाम होतो, ते येणारा काळच सांगू शकेल. परंतु, सध्या तरी ट्रम्प यांनी लादलेल्या अवाढव्य कराचा सरळ फटका राज्यातील सर्व मच्छिमारांना बसणार नसून फक्त निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना बसणार आहे. त्यातही फ्रोझन कोळंबी आणि फ्रोझन माकूल माशांच्या निर्यातदारांना अधिक अर्थिक फटका बसणार आहे. याच काळात महाराष्ट्रातून अमेरिकेत ३,४०० टन मासळीची निर्यात झाली असून १११ कोटी परकीय चलन भारताला उपलब्ध झाले आहे आणि भारतातून अमेरिकेत एकूण ३३० लाख मेट्रिक टन मासळी निर्यात केली आहे. ज्यामुळे भारताला २० हजार ५०० कोटींचे परकीय चलन प्राप्त झाले आहे. या निर्यातीमध्ये ३ लाख टन फ्रोझन कोळंबी आणि २० हजार टन फ्रोझन माकुल माशांच्या निर्यातीचा समावेश आहे. केंद्रीय सागरी मत्स्यकी संशोधन केंद्र (सीएमएफआरआय) या शासकीय संस्थेने मागील आठवड्यात एक अहवाल जारी केला. भारताच्या सागरी मासेमारीत २०२४मध्ये एकूण ३.४७ दशलक्ष टन मासळीची नोंद झाली असून २०२३च्या तुलनेत २ टक्के इतकी किंचित घट झाल्याचे त्यात नमूद केले आहे. एकूण मासेमारीत गुजरातने ७.५४ लाख टनांसह आघाडी कायम ठेवली असून, त्यानंतर तमिळनाडू (६.७९ लाख टन) आणि केरळ (६.१० लाख टन) यांचा क्रमांक लागतो. पश्चिम बंगाल, तमिळनाडू आणि ओडिशा यांनी अनुक्रमे ३५ टक्के, २० टक्के आणि १८ टक्के वाढ नोंदवली. तथापि, कर्नाटक, गोवा आणि दमण-दादरा नगर हवेली या राज्यांमध्ये मासेमारीत लक्षणीय घट झाली. संस्थेच्या वार्षिक सागरी मासेमारी आकडेवारीनुसार, देशात सर्वाधिक उतरणारी मासळी म्हणून २.६३ लाख टनांसह बांगडा (इंडियन मॅकरल) प्रथम क्रमांकावर होती, तर तेलसरडे (ऑईल सार्डीन) २.४१ लाख टनांसह दुसऱ्या स्थानावर होते. संपूर्ण भारतभर, बांगडा, थ्रेडफिन ब्रीम्स, तेलसरडे, रिबनफिश, नॉन-पेनाईड कोळंबी आणि सेफालोपॉड यांच्या मासेमारीत २०२४मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली. मात्र, लहान सारडे, पेनाइड कोळंबी, अँचोवीज आणि ट्युनीज यांच्या उतरणीत वाढ झाली. पश्चिम किनाऱ्यावर एकूण मासेमारीत घट झाली, तर पूर्व किनाऱ्यावर वाढीचा कल दिसून आला. महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश मात्र यात अपवाद ठरले. एकूण २.५ लाख मासेमारी प्रवासांचे निरीक्षण करण्यात आले, ज्यामुळे देशभरातील मासेमारीचा प्रयत्न आणि उत्पादकता स्पष्ट झाली. यामध्ये यांत्रिक नौकांनी प्रतिप्रवास सरासरी २,९५९ किलो मासळी, मोटरयुक्त नौकांनी प्रतिप्रवास १७४ किलो आणि गैर-मोटरयुक्त नौकांनी केवळ ४१ किलो प्रतिप्रवास इतकी मासळी उतरवली. संस्थेच्या अहवालात नमूद केले आहे की डाना, फेंगल, रेमल आणि असना यांसारख्या चक्रीवादळांमुळे मासेमारीवर मोठा परिणाम झाला. चक्रीवादळामुळे मासेमारीत घट झाली. आंध्र प्रदेश आणि केरळ येथे वाढलेल्या उष्णतेच्या लाटांनीही मासेमारीला मोठा फटका बसला. महाराष्ट्र राज्याच्या मासळीसाठ्यात ४७ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सन २०२३मध्ये २.११ लाख टन एवढ उत्पन्न झाले होते आणि २०२४ साली यामध्ये वाढ होऊन ३.११ लाख टन एवढे मासळी उत्पादन झाले. मात्र उत्पादन वाढूनही राज्यातील मच्छिमार समाधानी नाहीत. मासळी उत्पादनातील ही वाढ शाश्वत मासेमारीमधून झालेली नाही, हे त्यामागील कारण. गुजरात राज्याच्या मासळी साठ्यात वाढ होत नसून हा मासळीसाठा वर्षानुवर्षे स्थिर राहत असल्याने गुजरातमधील मच्छिमारांचे भविष्य स्थिर राहणार आहे. येथील मासळी व्यावसायिक शाश्वत मासेमारीला प्रोत्साहन देत असल्याने गुजरातचा मासळीसाठा स्थिरावला असून महाराष्ट्र राज्याने गुजरातच्या धर्तीवर पावले उचलण्याची गरज आहे, अन्यथा हा व्यवसाय महाराष्ट्र गमावून बसणार असल्याची भीती आहे.

गुजरात आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांचा सागरी भूगोल सारखाच आहे. पापलेट हा मासा गुजरात राज्यात प्रजनन करून महाराष्ट्रातील समुद्र क्षेत्रात वावर करतो, तर घोळ मासा वाढवण येथे प्रजनन करून गुजरातमध्ये वावरतो. विशेष म्हणजे, पापलेट हा महाराष्ट्राचा आणि घोळ हा गुजरात राज्याचा राज्य मासा म्हणून सरकारने घोषित केला आहे. असे असूनही दोन्ही राज्याच्या मासळी उलाढालीमध्ये ४ लाख टनांची तफावत आहे. गुजरातमध्ये पावसाळी मासेमारी बंदी कालावधीचे पालन तंतोतंत होत असल्याने शाश्वत मासेमारीला वाव मिळत असून त्यामुळे गुजरात सातत्याने मासळी क्षेत्रात आपले वर्चस्व गाजवत आहे. याउलट महाराष्ट्रात करंजा गावातील शेकडो मच्छीमार पावसाळी मासेमारी बंदी कालावधीचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणात अवैध मासेमारी करत आहेत. महाराष्ट्राच्या मासळीसाठ्यात २०२३च्या तुलनेत ४७ टक्के वाढ दर्शविली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे पालघर, ठाणे, मुंबई आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पारंपरिक मच्छीमारांनी पावसाळी मासेमारी बंदी कालावधी संपल्यानंतर सुद्धा १५ दिवस अधिक स्वतःहून बंदी केल्याने कोट्यवधी रुपयांची उलाढाल २०२४मध्ये झाल्याचे चित्र दिसून आले. पावसाळी मासेमारीवरील बंदी काळात स्वतःहून केवळ १५ दिवस वाढ करून मासळी उत्पादनात ४० टक्क्यांनी वाढ होत असेल तर पावसाळी मासेमारी बंदी कालावधी ९० दिवसांचा केल्याने शंभर टक्के वाढ निश्चितपणे होऊ शकेल. मात्र याचे पालन तंतोतंत व्हायला हवे. हे करण्यासाठी भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या बदल्या करून करून प्रामाणिक अधिकाऱ्यांकडे मत्स्यव्यवसाय विभागाचा कारभार दिला पाहिजे. करंजासारख्या मासेमारी बंदी कालावधीच्या नियमांना धाब्यावर बसवणाऱ्या गावावर सुरक्षा यंत्रणांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे. मासळी व्यवसायाला तारण्याचे काम करण्याची मानसिकता सरकारने दाखवली तरच महाराष्ट्र राज्याच्या मासळी व्यवसायात शाश्वत वाढ होऊन या व्यवसायाला सोनेरी दिवस येतील.

# खिश्यात हिंदुत्व ठेवलेला मी नाही, यापुढे आयोजकांना ताकद देणार : आ. संजय केणेकर

## सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमाने शहर हिंदुमय



**बीड | प्रतिनिधी**

काल बीड शहरात सकल हिंदु समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाबली हनुमान महाआरती व सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमास हिंदु विचारांच्या युवकां सोबतच महिलांची लाक्षणिक उपस्थिती होती. याबाबत सविस्तर वृत्त असे की, हिंदु धर्माच्या दृष्टीने पवित्र असलेल्या श्रावण मासातील शेवटचा शनिवार व शनि अमावास्या असा दुर्लभ योग साधून आल्याने शहरातील सकल हिंदु समाजाच्या वतीने किशन आबा चौहान व प्रशांत भैय्या डोरले यांनी आयोजित केलेल्या सामूहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रम व महाबली हनुमान महाआरती निमित्त बीड शहरातील असंख्य युवक, व हिंदुप्रेमींच्या समवेत महिलांची ही लाक्षणिक उपस्थिती तसेच परमपूज्य १०८ स्वामी डॉ. विरूपाक्ष शिवाचार्य महाराज, स्वामी योगीराज महाराज, विठ्ठल शास्त्री महाराज, एकनाथ महाराज पुजारी, सौम्य नृसिंह महाराज, सुरवसे महाराज, विनायक महाराज पाटांगणकर यांच्या दैवी आशीर्वादाने आणि लोकनेते आ. संजयजी केणेकर साहेब यांच्या उपस्थितीत हा धार्मिक महोत्सव यशस्वी झाला. यावेळी सूत्रसंचालन प्रशांत डोरले यांनी तर प्रास्ताविक करताना किशन चौहाण यांनी शहरातील विविध हिंदुत्वाच्या समस्या या जनतेसमोर मांडल्या व त्या सोडवण्यासाठी आगामी काळात सोडण्यासाठी युवकांनी अश्या एकत्रित कार्यक्रमाची गरज असल्याचे सांगितले. तर अध्यक्षीय भाषणात आ. संजय केणेकर साहेब यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून चालू असलेल्या विरोधकांच्या खोट्या दाव्यांवर जोरदार टीका करत हिंदुत्वासाठी सर्वतोपरी काम करत राहणार असल्याचे सांगितले तसेच हिंदुत्वाच्या विषयांवर काम करण्यासाठी कायम आयोजकांच्या मागे खंबीर उभे राहणार असल्याचे ही सांगितले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हाप्रमुख शंकरजी देशमुख, आनंदजी बार्शीकर, गणेश गुरखुदे, नवनाथ शिराळे, डॉ. मुरली जेसवानी, डॉ. पी.के. कुलकर्णी, अतुलजी घोरड, अमितकुमार मोदी, अभिषेक जोशी, शांतिनाथ डोरले, नगरसेवक राणा चौहाण, सम्राट चौहान, विक्रांत हजारी, अनिल घुमरे, श्रीकांत सानप, भीमराव दले यांची तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नरेंद्र मेहता, मयुर भालेकर, कृष्ना जाधव, कृष्ण पवणे, शुभम सुतार, ऋषी पांडव, आदित्य दोडके, कुणाल चव्हाण, विशाल उदावंत, सागर निंबाळकर, सुशांत सोनटक्के, कमलेश श्रीवास्तव, अक्षय चव्हाण, प्रतीक भोसले, शुभम दोडके, कपूर, चौहान, हेमंत काबरा, राम सदरे, शंकर घेवारे सह अन्य हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## पान १ आणि ४ वरुन...

पान १ आणि ४ वरुन...

### खा.सोनवणेंच्या...

व औद्योगिक दृष्ट्या मांजरा धरण अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मागील काही दिवसांपुर्वी धरण पुर्णपणे भरले होते. यानंतर सहा दरवाजे उघडून पाणी सोडण्यात आले होते. आता चार दरवाजे बंद करण्यात आले असून दोन दरवाज्यातून ४९.४८ क्यूसेक्सने मांजरा नदी पात्र पाण्याचा विसर्ग सुरू आहे. मांजरा धरणामुळे केज तालुक्यातील मोठ्या प्रमाणात हरीतक्रांती झालेली असून आज खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन होत आहे.

### सर्वांची साथ असेल...

सांगितले. जातीयवादी राजकारणाला आव्हान जलील यांनी भाजपसारख्या जातीवादी पक्षांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी मुस्लिम समाजाने एकजुटीने लढण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. महाराष्ट्रात गाय आणि गोरक्षणाच्या नावाखाली मुस्लिम समाजाच्या अस्मितेला धोका पोहोचवला जात आहे. संग्राम जगताप यांच्यासारखे नेते मुस्लिमविरोधी वक्तव्ये करतात, पण गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून याकडे दुर्लक्ष केले जाते, अशी टीका त्यांनी केली. त्यांनी पुढे सांगितले की, राज्यातील सत्ताधारी पक्ष सामाजिक तेढ वाढवण्याचे काम करत असून, याला आळा घालण्यासाठी आपली एकजूट हेच सर्वात मोठे हत्यार आहे. सामाजिक एकतेसाठी पुढाकार इम्तियाज जलील यांनी केवळ मुस्लिम समाजालाच नव्हे, तर सर्व समाजघटकांना एकत्र येण्याचे आवाहन केले. जातीयवादी शक्तींना केवळ एकजुटीच्या माध्यमातूनच पराभूत करता येईल. आम्ही सर्वांना सोबत घेऊन महाराष्ट्रात सामाजिक एकता आणि प्रगतीसाठी काम करू, असे त्यांनी जाहीर केले. येणाऱ्या निवडणुकीत पक्ष नियोजनबद्ध रणनीती अवलंबणार असून, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधी निवडण्यासाठी प्रयत्नशील राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. जनतेचा विश्वास जिंकण्याचे आश्वासन आम्ही जनतेच्या सेवेत कधीही कमी पडणार नाही, असे आश्वासन देत जलील यांनी उपस्थितांना पक्षाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले. तुमच्या मतदानाच्या रूपाने आम्हाला आशीर्वाद द्या, आम्ही महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने प्रगतीपथावर नेऊ, असे ते म्हणाले. माजलगाव येथील या सभेला कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती, आणि जलील यांच्या भाषणाने उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण झाला. नव्या राजकीय लढाईची तयारी एआयएमआयएमच्या या सभेने महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या लढाईची नांदी झाली आहे. सामाजिक एकतेसाठी आणि जातीवादी शक्तींविरुद्धच्या या लढ्याला माजलगावातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वाखाली पक्ष येणाऱ्या काळात अधिक आक्रमक आणि नियोजनबद्ध पावले उचलणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### जरांगे पाटलांच्या मुंबई ...

करणार आहेत. तेंव्हा या आंदोलनात ज्यांना जरांगे पाटलांच्या आंदोलनानंतर कुणबी म्हणून आरक्षणाचा लाभमिळाला आहे त्या सर्व कुणब्यांनी, वंचित, शोषितसह सर्व मराठा बांधवांनी लाखोंच्या संख्येत मुंबई येथील मोर्चात सहभागी व्हावे.

### हजरत शहेंशाह वली...

होण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर हजरत शहेनशाह वली दर्गा च्या पाठीमागे ठेवण्यात आले आहे. दिनांक २६ ऑगस्ट वार मंगळवार सकाळी दहा ते दुपारी चार वाजेपर्यंत रक्तदान शिबिर होणार आहे यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन इनसानियत फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोहिल शेख उपाध्यक्ष रिजवान चाऊस ,उपाध्यक्ष अकबर शेख, सचिव आवेझ शेख ,जिल्हा संपर्क अध्यक्ष अफरोज खान ,तालुका अध्यक्ष हमीद शेख ,तालुका युवक अध्यक्ष मोसिन शेख ,शहराध्यक्ष आवेज मणियार , सर्व समाजसेवक हमीद पाले खान ,अखील अण्णा नसीर खान ,अरफात खान शाहेद मेंबर, नदीम पटेल नईम लाला, जिशान लाला नवीद खान (बाबा) सलमान अली यांनी केले आहे.

### गेवराईत तणाव; समर्थकांचा...

जीवाचे रान केले होते. पंडितांचे सामाजिक कार्य: कार्यकर्त्यांनी दावा केला की, आमदार विजयसिंह पंडित यांनी गेवराई तालुक्यात धनगर समाजासह सर्वच समाजांना न्याय दिला आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यपदांपासून ते नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीपर्यंत अनेक संधी त्यांनी समाजातील लोकांना दिल्या आहेत. 'सुपारी' घेऊन बदनामीचा डाव: आमदार विजयसिंह पंडित यांची वाढती क्रेझ आणि लोकप्रियता पाहूनच कुणीतरी तुम्हाला त्यांची बदनामी करण्याची सुपारी दिली आहे, यात तीळमात्र शंका नाही. गेवराईची जनता तुमच्या वक्तव्याला भीक घालणार नाही, असा थेट आरोप आंदोलकांनी केला. सामाजिक सलोख्याचे आवाहन: मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा संदर्भ देत आंदोलकांनी सांगितले की, हा लढा गोरगरीब, कष्टकरी समाजाचा आहे. यात कोणीही जातीय तेढ निर्माण करून वातावरण दूषित करू नये. आमचा लढा न्यायासाठी आणि हक्कासाठी आहे आणि तो आम्ही जिंकणारच. राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण या घटनेमुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून आधीच संवेदनशील असलेल्या वातावरणात, दोन प्रमुख नेत्यांवरील टीकेमुळे हा नवा वाद निर्माण झाला आहे. प्रा. लक्ष्मण हाके यांच्या वक्तव्यामागे नेमका काय हेतू होता आणि या आंदोलनाचे राजकीय परिणाम काय होतील, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### बांधकाम कामगारांचा...

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून करुन माळी वेस, बलभीम चौक, कारंजा, बशीर गंज, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा गेला आहे. या मोर्चात बीड जिल्ह्यातील आरसीसी बांधकाम कामगार, प्लंबर, इलेक्ट्रीशन, बांधकाम साहित्य विक्री दुकानांवरील कामगार असे विविध कामगार या मोर्चात सहभागी झाले होते. हा भव्य दिव्य मोर्चा वाजतगाजत जिल्हाधिकारी कार्यालय धडकला यावेळी विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

### मुख्याधिकारी विक्रम...

कर्मचारी व अधिकारी तसेच दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे गेवराई शहरात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकाम होऊनही नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्या कडुन न.प. च्या बांधकाम विभागाच्या सावळ्या गोंधळाची परिस्थिती पाहता याबाबत दखल का घेतली जात नाही याचे उत्तर सापडेनासे झाले आहे शहरालगतच्या अनेक प्रभागात हद्दीत गेल्या काही दिवसांपासून विना परवानगी घर बांधकाम करण्याचा सपाटा लावण्यात आला आहे. कोणतीही परवानगी न घेता नियमांची पायमल्ली करीत बांधकाम सुरू आहे. यातून न.प.चा हजारो रुपयांचा महसूल बुडत आहे. मात्र राजरोसपणे होणारे अवैधरित्या बांधकाम रोखण्यासाठी नगरपरिषद अपयशी ठरली की काय अशी चर्चा ऐकवास मिळत असुन यामध्ये नियम धाब्यावर बसवून होणाऱ्या अनाधिकृत बांधकामाचे उदाहरण शहरात पुढे आले आहे. विना बांधकाम परवाना, नियम डावलून बांधकाम पूर्ण होत असून न.प. प्रशासन याकडे कानाडोळा करीत आहे. शहरात मागील सहा महिन्यांत विनापरवाना अनधिकृत बांधकामांचे प्रमाणही वाढले आहे.न.प च्या दुर्लक्षामुळे भूखंडाचे श्रीखंड खाणा-या भू-माफियांचे चांगलेच फावले आहे.शासनाच्या निर्देशाला पायदळी तुडवत न.प.ने दिलेल्या बांधकाम परवान्यातील अटीला केराची टोपली दाखवत मागील दोन वर्षांत शहरात अवैधरित्या बांधकामे मोठ्या प्रमाणात झाली आहे. यासंबंधी येथील नागरिकांनी तोंडी नगरपरिषद कार्यालयात कळविले असता अशा अवैधरित्या बांधकाम-धारकांना नोटिसा देऊन त्यांची बोळवण केली होती काहींनी विनापरवाना बांधकाम केले आहे. टोलेजंग इमारतीचे अवैध बांधकाम सुरू असताना संबंधित अधिकारी कुंभकर्णी झोपेत आहेत. या विषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. गेवराई शहरातील रस्त्यांवर अनधिकृत बांधकामाचे साहित्य पडलेले असून नागरिकांना रस्त्यावर येण्या -जाण्यास अडथळा निर्माण होत आहे तसेच अनधिकृतपणे बांधकामावर नगरपरिषद बांधकाम विभाग कारवाईचा बडगा कधी करणार ? असा सवाल देखील उपस्थित होत असून या परिसरातील नागरिकांनी नगरपरिषद बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार विनंती करून देखील संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत यांचा परिणाम सामान्य नागरिकांना भोगावे लागत आहे याबाबत माहिती घेऊन प्रकरणाची सखोल कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

दै.बीड सुपरफास्ट www.beedsuperfast.com

मंगळवार दि. २६ ऑगस्ट, २०२५ पान ४


## सय्यद इलियास यांच्या धडपडीमुळे ११ वर्षांच्या मुलीचा प्राण वाचला!

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी सिव्हिल हॉस्पिटल मधून सय्यद इलियास यांना तातडीचा फोन आला. एका ११ वर्षांच्या मुलीला वारंवार झटके येत असल्याने डॉक्टरांनी तिला औरंगाबादला रेफर करण्याचा सल्ला दिला होता. मात्र रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याने वेळ वाया घालवणे धोकादायक ठरू शकत होते. यावेळी सय्यद इलियास यांनी धडपड करून तातडीने नीरा हॉस्पिटलचे बालरोग तज्ज्ञ डॉ. राहुल राऊत यांच्याशी संपर्क साधला. डॉ. राऊत यांनी व्हेंटिलेटरची सुविधा उपलब्ध नसतानाही उपचार करण्याचा निश्चय व्यक्त केला. रात्रीभर काळजीपूर्वक उपचार करून डॉ. राहुल राऊत यांनी त्या मुलीला स्थिर केले. आज सकाळी ८ वाजता स्वतः डॉ. राऊत यांनी सय्यद इलियास यांना फोन करून कळवले की रुग्णाची प्रकृती आऊट ऑफ डेंजर आहे. सय्यद इलियास यांची योग्यवेळी केलेली धडपड आणि डॉ. राहुल राऊत यांचे अथक प्रयत्न यामुळे ११ वर्षांच्या निरागस मुलीचा जीव वाचला. रुग्णाच्या कुटुंबीयांनी दोघांचेही मनःपूर्वक आभार मानले.



## गेवराईत तणाव; समर्थकांचा तीव्र संताप

# आ.पंडित यांच्यावरील टीकेमुळे लक्ष्मण हाकेंच्या पुतळ्याचे दहन



**गेवराई । प्रतिनिधी**

ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी बीड जिल्ह्यातील आमदार विजयसिंह पंडित आणि आमदार प्रकाशराव सोळंके यांच्यावर केलेल्या कथित वादग्रस्त वक्तव्याचे तीव्र पडसाद गेवराई शहरात उमटले. संतप्त झालेल्या मराठा आणि ओबीसी समाजातील युवकांनी प्रा. हाके यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला आधी दंडुकाने मारहाण केली, नंतर तो पायाखाली तुडवून जाळला. या घटनेमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून, आमदार समर्थकांनी हाके यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडले आहे.

गेवराई शहरात आज आमदार विजयसिंह पंडित यांच्या समर्थकांनी प्रा. लक्ष्मण हाके यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला. दीपक तात्या आतकरे यांच्या मार्गदर्शनाखाली जमलेल्या कार्यकर्त्यांनी, तुम्ही कोणाला आणि काय बोलताय, याचे भान ठेवा, अशा शब्दांत हाकेंना इशारा दिला. विजयसिंह पंडित आणि शिवछत्र परिवार हा अठरा पगड जातींसाठी अहोरात्र काम करणारा नेता आहे, असे सांगत कार्यकर्त्यांनी हाके यांच्या पुतळ्याला जोडे मारो आंदोलन केले. संतापाच्या भरात कार्यकर्त्यांनी पुतळ्याला लाथाबुक्क्यांनी तुडवत आणि शिव्यांची लाखोली वाहत त्याचे दहन केले. यावेळी सोमनाथ गिरगे, मुक्ताराम अव्हाड, संजय दाभाडे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

समर्थकांचे आरोप आणि भूमिका

राजकारणात समाज आणू नका: समाजाचा विषय वेगळा आणि राजकारण वेगळे. तुम्ही सामाजिक मुद्द्यांना राजकीय रंग देत आहात, असे आंदोलकांनी म्हटले. त्यांनी आठवण करून दिली की, मागील लोकसभा निवडणुकीत जेव्हा 'ओबीसी विरुद्ध ओपन' असा संघर्ष निर्माण झाला होता, तेव्हा याच शिवछत्र परिवाराने ओबीसी नेत्यांच्या विजयासाठी » पान २ वर



## सिंदफणा शाळेला सीबीएसई क्लस्टर वॉलीबॉल स्पर्धेत उपविजेतेपद

**माजलगाव । प्रतिनिधी**

विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी २०२५–२६ सी.बी.एस.ई. क्लस्टर वॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उंच केले आहे. या यशाबद्दल शाळेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.एम व्ही एम कॅम्पस, अंधेरी, मुंबई येथे गेल्या आठवड्यात १९ ते २३ ऑगस्ट २०२५ दरम्यान आयोजित या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत शाळेच्या १४ वर्षे आणि १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींनी सहभाग घेतला होता.१४ वर्षे मुले संघ : शिवराज कंटुले (कर्णधार ) अनंत वायाळ उपकर्णधार , विराज कदम, आदिराज कदम, अनुकल्प वारे, स्वप्नज गादेवाड, ओमकार गुळभिले, कैवल्य सोळंके, रविराज तेलगड, वेदांत तौर, संग्राम शिंदे शिवम कापसे या संघाने अप्रतिम कामगिरी करत उपविजेतेपद (द्वितीय स्थान) पटकावले आहे. तरुण खेळाडूंच्या या उत्कृष्ट यशाने संपूर्ण माजलगाव तालुक्यात गर्वाची भावना निर्माण झाली आहे.१९ वर्षे मुली संघ: सानिका सोळंके,(कर्णधार ) श्रावणी तौर, स्नेहल शिंदे, प्रांजल उडान, कीर्ती आर्दड, रेणुका सोळंके, श्रावणी सोळंके या संघाने कठोर मेहनत आणि उत्कृष्ट सांघिक भावनेने खेळत तृतीय स्थान मिळवले आहे. सर्व खेळाडूंनी संघकार्याचा उत्तम नमुना सादर केला.

## काझी तौहिद यांचा दुबईत बीटेकसाठी प्रवेश

### काझी ॲण्ड संघानी ग्रुप तर्फे सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

मिल्लिया आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय, बीड येथे B.Tech, BITS Pilani, Dubai मध्ये प्रवेश मिळवून संस्थेचा मान उंचावणाऱ्या काझी तौहीद समीर यांचा प्रसिद्ध उद्योजक काझी अँड संघानी ग्रूप तर्फे हृदयी सत्कार करण्यात आला.



ही बाब विसरता कामा नाही की काझी तहीद बी टेक साठी दुबईत शिक्षण घेणारे बीड जिल्ह्याचे पहिले विद्यार्थी ठरले आहे जे जिल्ह्यासाठी अभिनंदनी बाबा आहे यांच्यावर जिल्ह्याभरातून शुभेच्छा च्या वर्षात होत आहे जिल्ह्यातील प्रसिद्ध उद्योजक ग्रुप काझी अँड संघानी तर्फे काल त्यांच्या हृदयी सत्कार करण्यात आला यावेळी प्रसिद्ध उद्योजक महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष तथा काझी तोहिद चे वडील समीर काजी साहेब , अतुल संघानी साहेब,शकील शेख साहेब व आदी उपस्थित होते.

# बांधकाम कामगारांचा मोर्चा बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा आरसीसी बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष शेख अलिम पटेल यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्यांसाठी आज सोमवारी (दि.२५) दुपारी १२ वाजता भव्य मोर्चा आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला, यावेळी आंदोलकांच्या हातात विविध मागण्यांचे फलक लक्ष वेधून घेत होते. तर हा भव्य दिव्य मोर्चा पाहून अलिम पटेल यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची एकजूट झाल्याचे दिसून आले. वाळूचे टेंडर करुन वाळू घाट सुरू करावे, कामगारांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र ग्रामसेवकांकडून तात्काळ देण्यात यावे, नोंदणी व नुतनीकरणाशी संबंधित प्रलंबित कामे तात्काळ काढण्यात यावे, विविध लाभाचे अर्ज, कामगारांना अडथळा निर्माण करणाऱ्या किरकोळ त्रुटी, करेक्शनची प्रक्रिया, नोंदणीकृत कामगाराचा कामावर दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना लाभ मिळावा, ऑफलाईनमध्ये मृत्यू झालेल्या कामगारांच्या वारसाला भेटणारा लाभ तात्काळ सुरू करावे या सह विविध मागण्यासाठी जिल्ह्यात नोंदणीकृत असलेले बीड जिल्हा आरसीसी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील कामगारांचा मोर्चा काढण्यात आलेला. या मोर्चाची सुरुवात » पान २ वर






## बालेपीर भागात सिग्नल यंत्रणा बसवावी–खमरोद्दीन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बालेपीर भागातून जाणारा बीड अहिल्यादेवी नगर महामार्ग एक प्रमुख रस्ता आहे या मार्गावरील जुना नगर नाका ते पोलीस पेट्रोल पंप दरम्यान सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीने बालेपिरवासी बेजार झाले आहेत येथे वाहतूक कोंडी ही मोठी समस्या निर्माण झाली आहे सार्वजनिक वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित ठेवण्याचे दृष्टीने बालेपिर येथे सिग्नल बसवण्यात यावेत अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे शहर अध्यक्ष मोहम्मद खमरोद्दीन यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे



मोहमद खमरोद्दीन यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की शहरातील बालेपीर परिसरात वाहतुकीच्या प्रचंड ताण असून या परिसरातील चौकात सिग्नल व इतर नियंत्रण व्यवस्था नसल्याने नागरिकाच्या जीवीतास कबीर धोका निर्माण होऊ शकतो धानोरा रोड पोलीस कॉलनी अंकुश नगर ग्रामसेवक कॉलनी कालिका नगर भक्ती कंट्रक्शन अजमेर नगर रोड काझी नगर रोशन पुरा बालेपीर चराटा फाटा सह या परिसरातील नागरिक शालेय विद्यार्थी वधद नागरिक महिलांना बाजार हॉट जिल्हाधिकारी कार्यालय तहसील कार्यालय न्यायालय पंचायत समिती सार्वजनिक बांधकाम विभाग आदी कार्यालये मार्गावर असल्याने येथे जाण्यास नागरिकांना अडचणी येत आहेत या मार्गावर चार चाकी ऑटो रिक्षा दुचाकी तसेच मालवाहतुकीचे वाहने खाजगी ट्रॅव्हल्स बसेस अवजड वाहने याच मार्गाने प्रवास करत आहेत मागील काही काळात येथे घडलेल्या अपघाताचे अनेकांना गंभीर दुखापती झाल्या आहेत सततच्या वाहतूक कोंडी अपघाताचे प्रमाण वाढले आहेत प्रशासनाने कोणतीही ठोस पावले ना उचलल्याने वाहतूक कोंडीच्या प्रश्न उपस्थित होत आहे सरोजनी वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित ठेवण्याचे दृष्टीने जुना नगर नाका धनगर रोड टी पॉईंट पोलीस पेट्रोल पंप येथे सिग्नल यंत्रणा बसण्यात यावी तोपर्यंत वाहतुकीसाठी ट्रॅफिक पुरुषाच्या बंदोबस्त ठेवण्यात यावा याच्या फायदा बाले पीर भागातील वाहतुकीला शिस्त लावण्यात होवन शिवाय वाहतुकी ही खोळबणार नसल्याचे निवेदनात खमरोद्दीन यांनी नमूद केले आहे.

### माजलगाव येथे अमृत मेळावा उत्साहात

## शिक्षण, कौशल्य आणि उद्योग एकच व्यासपीठावर

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने शनिवार, २३ ऑगस्ट रोजी माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्र' पार पडले. विविध शैक्षणिक योजना, कौशल्यविकास उपक्रम आणि उद्योगासाठी उपलब्ध संधींची माहिती एकाच व्यासपीठावर देणारा हा मेळावा उत्साहात रंगला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारतमातेच्या पूजनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व योजनांची माहितीपुस्तिका देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी तहसीलदार संतोष रुईकर यांनी मेळाव्याचे उद्घाटन करत मार्गदर्शन करताना सांगितले की, शासन सर्वांसाठी विविध योजना घेऊन आलेले आहे. प्रत्येकाने पुढे येऊन त्याचा लाभ घेतला पाहिजे तसेच अमृतच्या लक्षित गटातील लाभार्थ्यांना कधीही अडचणी आल्यास प्रशासन सदैव पाठीशी उभे राहील. अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ समितीचे सचिव ब्रह्मानंदजी चक्रावर यांनी लाभार्थ्यांना योजनांचा सखोल अभ्यास करून जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन केले.


**दैनिक बीड सुपरफास्ट** हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक **अतुल शंकरराव जाधव** यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स ॲण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ ( महाराष्ट्र राज्य) येथून छापून, **दैनिक बीड सुपरफास्ट** कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका : अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. **संपादक : अतुल शंकरराव जाधव**

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE : NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN - 431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV